
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 5 | JANUARY - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आत्मचरित्र लेखनातील अडचणी



डॉ.वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिरोडा.
जिल्हा– गोदिंया,(महाराष्ट्र)

## 1 सत्यकथन

आत्मचरित्र म्हणजे सत्यापासनू सुरू होणारी आणि सत्यावरच विराम पावणारी लेखकाची जीवनयात्रा असते. आत्मचरित्रात कल्पित गोष्टींना स्थान नसते. 'जे अनुभवलं आहे ते प्रकट करावं, जे भोगलं ते सांगावं आणि जे प्रत्यक्ष दिसलं ते दाखववां' ही आत्मचरित्र लेखकाची भूमिका असली पाहिजे. पण बऱ्याच वेळा ही भूमिका सांभाळताना 'जे अनुभवलं त्याची चिकित्सा करायची, जे भोगलं त्याची प्रमाणं द्यायची आणि जे जे दिसलं त्याचे आधार स्पष्ट करायचे आणि शेवटी आपलं तत्त्वज्ञान वाचकांच्या मनावर ठसवायचं' ही आत्मचरित्र लेखकांची वृत्ती होते आणि मग आत्मचरित्रातून 'सत्याचे प्रयोग' न होता सत्य लपविण्याचे प्रयोग होताना दिसतात.

आत्मचरित्रात लेखकाला स्वतविषयी सत्य सांगायचे असते; कारण ''आत्मचरित्र कल्पित नसते, तो एका व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या समूहाचा इतिहास असतो. आत्मचरित्रातील व्यक्ती, घटना, प्रसंग, कृती, काळ, समाज इत्यादी गोष्टी प्रत्यक्षातल्या आणि खरोखर घडलेल्या असतात''[1] आणि 'त्या मी तशाच स्वरूपात मांडेन' अशी प्रतिज्ञा करून लेखकाने आत्मचरित्रात मांडल्या पाहिजेत, तरच सत्याचा खरा आविष्कार होईल. ज्याची अपेक्षा वाचक करीत असतात.

आत्मचरित्रातून लेखकाला केवळ सत्यच सांगायचे असते हे मान्य केले तरी वास्तवातील सत्याला नेहमी तीन बाजू असतात. (1) 'मी'ला जाणवलेले सत्य (2) इतरांना जाणवलेले सत्य (3) प्रत्यक्ष सत्य. या तीनपैकी आत्मचरित्रकार केवळ 'मी'ला जाणवलेले व भावलेले सत्यच आत्मचरित्रातून मांडत असतो. त्यामुळे सत्य बोलणे सोपे आहे परंतु सत्य लिहिणे कठीण आहे, असेच म्हणावे लागेल. सत्याच्या तीन बाजूंपैकी आत्मचरित्रात केवळ एकाच बाजूने वर्णन होत असल्यामुळे निष्पक्ष, वस्तुनिष्ठ आणि निरपेक्ष सत्य आत्मचरित्रातून मांडताना अनेक अडचणी निर्माण होतात.

आयुष्याच्या कुठल्यातरी एका टप्प्यावर लेखक आत्मचरित्र लिहायला बसतो. त्याच्या दृष्टीने तो त्याच्या गतजीवनाचा स्मृतिरूप इतिहासच असतो. या स्मृती त्याच्या स्मरणशक्तीवर अवलंबून असतात. परंतु माणसाला जशी स्मरणशक्तीची देणगी लाभलेली आहे तशीच त्याला विस्मृतीची, प्रवृत्तीची आहे, हेही लक्षात घेणे गरजेचे आहे. कुठल्याही व्यक्तीला आपल्या आयुष्याच्या क्षणाक्षणाचा हिशेब ठेवणे शक्य नसते. ''क्वचित काही व्यक्तींना दैनंदिनी लिहायची किंवा महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी करून ठेवायची सवय असते, परंतु हा प्रयत्न अतिशय मर्यादित स्वरूपाचा ठरतो किंवा असतो.''[2] ही वस्तुस्थिती आहे. यामुळे आत्मचरित्रलेखन करणाऱ्या लेखकाचा सारा खेळ त्याच्या स्मरणशक्तीवर अवलंबून असतो. या समरणशक्तीच्या संदर्भात आनंदीबाई विजापुरे म्हणतात, ''पण मला माझं बालपण काही म्हटल्या काहीच आठवत नाही. मी प्रतिभावान साहित्यिक नसेन म्हणून असो किंवा माझ्या जीवनसरोवरात शांततेपेक्षा वादळेच अधिक असल्यामुळे असो. माझ्या बालपणाचं प्रतिबिंब मला फार अस्पष्ट दिसतं.''[3] त्यामुळे बालपणीच्या आठवणींच्या लेखनाच्या वेळी तो जे लेखन करतो त्या काळापासून तो खूप दूर

गेलेला असतो. त्याच्याही मनात त्या आठवणी फार धूसर झालेल्या असतात. त्यामुळे तेव्हाचे आता आठवताना आठवणींच्या तपशिलात चूकभूल होण्याची शक्यता आहे. तसेच त्या संदर्भात लेखकाचे गैरसमज आणि पूर्वग्रहही असू शकतात. या सर्व गोष्टींमुळे बालपणातील आठवणींचा अस्सलपणा लोप पावतो आणि बऱ्याच वेळा सत्यदर्शनाला अडथळा निर्माण होत असतो.

आत्मचरित्रातील घटना आणि प्रसंग यांची निवड करण्याचे लेखकाचे स्वातंत्र्य अबाधित आहे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही; परंतु आत्मप्रेमामुळे बऱ्याच वेळा तो पक्षपाती बनतो. घडलेल्या घटना–प्रसंगाची निवड करताना आत्मचरित्रकाराची भूमिका आत्मसमर्थनाची होताना दिसते. मग स्वतःला प्रतिकूल ठरणाऱ्या घटनांबद्दल तो मौन बाळगतो किंवा लिहिण्याचे टाळतो तर अनुकूल ठरणाऱ्या घटनांबद्दल लिहिताना त्या घटनांचे वर्णन फुगवून करू लागतो. काही मुद्यांना शिताफीने बगल दिली जाते तर काही घटनांच्या बाबतीत जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जाते. आत्मचरित्रांवर आत्मप्रेमाचे गडद रंग चढतात व सत्याची जाणीवपूर्वक अवहेलना केली जाते. ''प्रत्यक्षात घडणाऱ्या सत्य घटनेचीदेखील व्यक्तिपरत्वे किती वेगवेगळी आकलने होत असतात याची प्रतीती आपल्याला येते म्हणूनच आत्मचरित्रपर लेखन करणाऱ्या व्यक्तीच्या संदर्भातली 'एक माणूस' म्हणून असणारी अशा स्वरूपाची मर्यादा गृहीतच धरावी लागते''[4] असे उषा हस्तक यांना वाटते.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. याला आत्मचरित्राचा लेखकही अपवाद नाही. कुठल्याही लेखकाला समाज पूर्णपणे दुर्लक्षित करून लेखन करणे शक्य होत नाही. ज्या समाजात तो जगतो त्या समाजाच्या नीतिकल्पना, मूल्यव्यवस्था, सामाजिक संकेत यांची बंधने लेखकाच्या मुक्त अभिव्यक्तीवर नियंत्रणे प्रस्थापित करीत असतात. समाजाची सेन्सॉरशिप मुकाट मनाने लेखक स्वीकारत असतो. म्हणून 'बलुतं'मध्ये दया पवार म्हणतात, ''आता मी जे सांगणार आहे ना, ते माझ्या घरच्या भानगडीबद्दल. आतापर्यंत दुसऱ्यांची लफडी काढण्यात मी चांगलाच रस घेतला, पण स्वतःच सांगताना मात्र कासावीस होतोय. अर्थात भारतीय समाजातील नीतीचं जे ओझं आहे ते माझ्याही मानेवर आहे.''[5] अर्थातच आत्मचरित्रात जे लेखकाचे खाजगी जीवन व्यक्त होत असते ते तत्कालीन समाजाच्या नैतिक नियमांनुसारच व्यक्त होत असते. त्यामुळे लेखकाचे खाजगी जीवन त्याच्या अस्सल स्वरूपात येण्यास अडचण निर्माण होते. प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत आणि लेखक मोनतेन आत्मचरित्राच्या संदर्भात लिहितो – ''मै अपने गुण–दोष जग–जीवन के सन्मुख रखने जा रहा हुँ। पर ऐसी स्वाभाविक शैली में जो लोक–शील से मर्यादित हो। यदि मेरा जन्म उन जातियों में हुआ होता जो आज भी प्राकृतिक नियमों की मूलभूत स्वच्छंदता का सुखद उपभोग करती रहती है, तो मैं आपको विश्वास दिलाता हुँ की मै बडे आनंद से अपने आपको अपाद मस्तक एकदम नग्न उपस्थित कर देता।''[6] यावरून आत्मचरित्राचा लेखक आत्मचरित्रलेखन करताना पूर्णपणे स्वतंत्र नसतोच. आत्मचरित्रातील सत्यकथनावर प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष रूपात ही सामाजिक बंधने परिणाम करीत असतात.

आत्मचरित्र ही पूर्णपणे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीची कथा आहे. त्याच्या यशापयशाची गाथा आहे. या जडणघडणीत अनेक व्यक्ती सहभागी होत असतात. यामध्ये कुटुंबीय, मित्र, नातेवाईक आणि ज्या–ज्या व्यक्तींशी त्याचा संबंध आला अशा समाजातील सर्व व्यक्तींचा समावेश होत असतो. या सर्व व्यक्तींचं चित्रण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत करण्याचं स्वातंत्र्य त्याला आहे. परंतु या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वावर टीका करण्याचा आणि त्यांच्यासंदर्भात निष्कर्ष नोंदविण्याचा अधिकार त्याला नाही. आपल्या आत्मचरित्रात स्वतच्या शरीरावरची सर्व वस्त्रे उतरविण्याचा त्याचा अधिकार सुरक्षित आहे. परंतु इतरांच्या शरीरावरील वस्त्रे उतरविण्याचा त्याला अधिकार नाही. दुसऱ्याची बदनामी करणारी सत्ये, जिवंत नातेवाईक, स्नेही, मित्र यांच्या भावना दुखविण्यासारखा मजकूरही नैतिक जबाबदारीच्या दृष्टीने टाळावाच लागतो. यामुळेच आत्मचरित्राच्या निवेदनात असलेल्या निष्पक्षपाती भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होताना दिसते.

आत्मचरित्रात मांडलेल्या घटना ह्या भूतकाळातील असतात. त्याचे लेखन मात्र लेखक वर्तमानकाळात करीत असतो. आयुष्यात कधीकाळी घडलेल्या घटनांपैकी फक्त काहीच घटना तो आत्मचरित्राच्या रूपाने मांडत असतो. या घटनांची निवड प्रत्यक्ष लेखन करीत असलेल्या घटनांचे लेखन ज्यावेळी लेखक करीत असतो त्यावेळी त्याच्याजवळ आयुष्यभर कमावलेली समृद्ध आणि संपन्न भाषा असते, परिपक्व विचार असतात. या परिपक्व विचार आणि भाषा यांच्याद्वारे तो भूतकालीन घटना लिहीत असतो. त्यामुळे भूतकाळात घडलेल्या त्या घटनेचे स्वरूप बदलण्याची किंवा प्रभावित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ''वयाच्या सत्तरीत असणारी मनस्थिती आणि दृष्टिकोन सत्तावन्नव्या वर्षीच्या मनस्थितीपेक्षा आणि दृष्टिकोनापेक्षा भिन्न असणे स्वाभाविक आहे''[7] हे स्वीकारावे

लागते. यामुळेही आत्मचरित्रातील निखळ वास्तवाच्या संदर्भात शंका घेण्यास पुरेशी जागा शिल्लक आहे असे म्हणावेसे वाटते.

लैंगिक अनुभव हा व्यक्तीचा खाजगी प्रांत होय. आपल्या समाजात अशा अनुभवांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजूनही निकोप नाही. लैंगिक बाबींसंबंधी चोरटे कुतूहल, भरपूर परंतु प्रौढ, प्रगल्भ वृत्तीने त्याचा विचार करण्याची दृष्टी दुर्मिळ आहे. या कारणामुळे आत्मचरित्रात आपल्या लैंगिक अनुभवांचे चित्रण करताना लेखकही संकोच करताना दिसतात. फक्त काही बोटावर मोजण्याइतक्या आत्मचरित्रात लेखकांनी स्वतःच्या प्रेमसंबंधाचे चित्रण केलेल आढळते. यामध्ये 'अजून चालतेची वाट'— आनंदीबाई विजापुरे, 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' — मलिका अमरशेख, 'मातीची चूल' — आनंद साधले यासारख्या आत्मचरित्रांमधून लैंगिक विषयाचे मोकळे चित्रण दिसते. परंतु आत्मचरित्रांची भरमसाठ संख्या पाहता अशा आत्मचरित्रांची संख्या नगण्य आहे. याचे कारण सामाजिक बंधने, लेखकांचा संकोच, नीतिनियम किंवा सभ्यतेच्या मर्यादा यामुळे सत्य लपविले जाते, याची जाणीवसुद्धा सुजाण वाचकाला झाल्याशिवाय राहात नाही.

## 2 तटस्थता

आत्मचरित्र कल्पित नसते, तो एका व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या समूहाचा इतिहास असतो. आत्मचरित्रातील घटना, व्यक्ती, प्रसंग, काळ, कृती, समाज इत्यादी गोष्टी प्रत्यक्षातल्या आणि खरोखर घडलेल्या असतात. या सर्वांचे आत्मचरित्र लेखकाने तटस्थपणे वर्णन केले तरच आत्मचरित्र आत्मगौरव, आत्मवंचना यासारख्या दोषांपासून अलिप्त राहू शकते. परंतु स्वतःकडे तटस्थवृत्तीने पाहण्यातही अशा अनेक अडचणी येतात हे जाणवते. त्यामुळे एकूणच आत्मचरित्रलेखनात वस्तुनिष्ठतेचा अभाव जाणवतो.

आत्मचरित्रात ''यथातथ्य चित्रण करणे ही तारेवरची कसरत आहे. आपण कसे आहोत हे समजून घेण्याच्या भरीस न पडता आपण लोकांना कसे दिसावे यासाठीच माणसांची धडपड चालू असते. त्याचा हा स्वभावच आहे. त्यामुळे आत्मचरित्रात तटस्थता सांभाळणे कठीण होऊन बसते.''[8] आत्मदर्शन हा आत्मचरित्राचा हेतू असावा. आत्मस्तवन किंवा आत्मप्रदर्शन नाही. अनेक आत्मचरित्रांमध्ये दर्शन घडविण्याऐवजी वर्णन केले जाते. वर्णन करणे सोपे असते. एखादी व्यक्ती सज्जन किंवा दुर्जन आहे हे सांगणे सोपे असते. केवळ विशेषणयुक्त वर्णन म्हणजे दर्शन नव्हे हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. आत्मचरित्रे जर कलात्मक करायची असतील तर आत्मदर्शन घडविता आले पाहिजे. आत्मदर्शनाऐवजी आत्मप्रेमाच्या विळख्यात आत्मचरित्राचा लेखक सापडतो. ''तो स्वतच्या संदर्भात पक्षपाती बनतो. घडलेल्या घडामोडींची निवड करताना, त्याचा अन्वयार्थ लावताना, त्याचे निवेदन करताना तिची भूमिका आत्मसमर्थनाची असते. त्याचप्रमाणे तिला प्रतिकूल ठरणाऱ्या गोष्टीविषयी ती मुग्धता बाळगते किंवा तिला इष्ट अशी झाकपाक करते.''[9] अशाप्रकारे आत्मप्रेमामुळे कळत—नकळत लेखकाचा तटस्थपणा ढळतो. सबंध लेखनच आत्मदर्शन करण्याऐवजी आत्मसमर्थन करू लागते. माधवी देसाई यांचे 'नाच ग घुमा' हे याचं सुंदर उदाहरण आहे. ''आपल्यावर कसा अन्याय झाला हे बहुसंख्य स्त्री—पुरुष आत्मचरित्राचे मराठीतील सूत्र माधवीबाईंनी इमानेइतवारे व्यक्त केले असल्याचे जाणवते. त्यांच्यावर हा अन्याय करणारे त्यांचीही काही बाजू असू शकेल, त्यांचेही काही स्वतःचे दोष असू शकतील अशी शंकाही हे आत्मचरित्र वाचताना येत नाही. त्यामुळे अशा आत्मचरित्रांचा स्वसमर्थन हे एक केंद्र असते. 'नाच ग घुमा' मध्ये सुरुवातीचा बाळपणाचा काळ सोडला तर पुढील सर्व भाग स्वसमर्थनातच खर्च होतो''[10] असे निरीक्षण प्रल्हाद बडेर या आत्मचरित्राच्या संदर्भात नोंदवितात.

जीवन जगत असताना अनेक प्रकारचे अनुभव येणे ही एक स्वाभाविक प्रक्रिया आहे. कोणत्या प्रसंगाचा व्यक्तीच्या मनावर कसा आणि किती खोल ठसा उमटेल याचे गणित मांडता येत नाही. पण काही वेळा एखाद्याच अनुभवामुळे व्यक्तीची जीवनविषयक धारणा बदलून जाते हे मान्य करावे लागेल. जगताना व्यक्तीला कटू अनुभवही येतात. पण कटू अनुभवामुळे एखाद्या व्यक्तीच्या वृत्तीतच कटुता मुरून बसते. मग सभोवतालच्या वास्तवाकडेही ती व्यक्ती अशाच शबलित वृत्तीने पाहू लागली तर अशा व्यक्तीला समतोल तटस्थ वृत्तीने वास्तवाचा अन्वयार्थ कसा लावता येणार? हा प्रश्न आत्मचरित्र लेखनाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरतो.

आत्मचरित्राचे लेखन कलात्मक व्हायचे असेल तर लेखकाला स्वतच्याच जीवनाकडे तटस्थ भूमिकेतून बघता येणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याला स्वतःच्या जीवनाचे अलिप्तपणे दर्शन घडविता येणार नाही. आपल्या चुका जाहीरपणे कबूल करायला व्यक्तीला सर्व अहंकार बाजूला ठेवावा लागतो. सारा अहंभाव नष्ट होणे ही महान योग्यांनाही साधण्यास कठीण अशी साधना आहे. या साधनेशिवाय जीवनाचे दर्शन अलिप्तपणे घडविणे अशक्य

आहे. सामान्यपणे जेव्हा आत्मचरित्रे लिहिली जातात तेव्हा आपल्याजवळ काहीतरी सांगण्यासारखे आहे असेच लेखकाला वाटत असते. त्यात स्वतच्या कर्तबगारीचा अभिमान असेल किंवा दुखाची जाणीव तीव्र असेल. आपण केलेले साहस दुसऱ्यांनी ऐकावे असे वाटत असेल. अशाप्रकारचे काही ना काही सांगण्यासारखे हमखास आपल्याजवळ आहे असे वाटूनच आत्मचरित्रांचे लेखन केले जाते. त्यामुळे स्वतःकडे तटस्थपणे बघणे कठीण होऊन बसते आणि आत्मचरित्रांचे लेखन कलात्मकतेपासून दुरावते.

स्वतच्या जीवनाचे तटस्थ अवलोकन करताना म्हणूनच काही लेखकांना पारंपारिक आत्मचरित्राचे रचनातंत्र अपुरे वाटू लागते. कमल पाध्ये लिहितात – ''कुणाशी जिव्हाळ्यानं गप्पा मारताना अनेकदा आठवणीचे अनेक बंध मोकळे होतात हे खरे असले तरी जीवनातल्या केवळ घटनांची नोंद करणाऱ्या पारंपरिक आत्मचरित्रातून स्वतःच्या मनाची संवेदनशील स्पंदनं आणि जीवनातल्या सर्व घटना अगदी प्रामाणिक मोकळेपणानं कुणी लिहू शकेल यावर माझा विश्वास नाही. मला तर नक्कीच तसं लिहिता येणार नाही. आत्मकथनात्मक लिखाणात पुष्कळदा निर्लेप वृत्तीपेक्षा स्वतच्या वागण्या–बोलण्याचे समर्थनच होत राहते आणि आत्मकथनाच्या प्रकारात तसं होणं अपरिहार्य असतं. या दोन्ही प्रकारचं लेखन करायची माझी इच्छा नव्हती.''[11] स्वाभाविकच स्वतच्या आंतरिक आणि बाह्य जीवनाचा तटस्थपणे आणि प्रामाणिक शोध घेताना कमल पाध्ये यांना आत्मचरित्र लेखनाची पारंपरिक चौकटच अधुरी वाटते; किंबहुना निखळ आत्मशोधाच्या मार्गाने जाणाऱ्या कुठल्याही लेखकाला आत्मचरित्र लेखनाचे अपुरेपण लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

दिलखुलासपणे जीवनाचा उपभोग घेणाऱ्या व्यक्ती जीवनाकडे खेळकर भूमिकेतून पाहात असतात. एक 'माणूस' म्हणून जाणवणाऱ्या आपल्या सहज स्वाभाविक प्रेरणांसह आणि प्रवृत्तीसह त्या जीवनाला सामोऱ्या जात असतात. आपल्या नैसर्गिक भावभावनांना, इच्छा–आकांक्षांना कृत्रिम आवर न घालता जीवनाला उत्कटपणे प्रतिसाद देत असतात. अशा व्यक्तींचे अनुभवविश्व समृद्ध असतेच. त्यांच्यातील जिवंतपणाची थरथरही आपल्याला लेखनात जाणवत असते.'' जी व्यक्ती जीवनावर मनापासून प्रेम करीत असते, तिचे जीवनाशी असणारे लागेबांधे हे केवळ स्वार्थप्रेरित नसतात. त्यामुळे अशा व्यक्तींचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हादेखील अधिक मोकळा आणि निकोप असू शकतो. जीवनात जे काही घडत असते त्यात तिची भावनिक गुंतवूणक नसते असे नाही; परंतु असे असले तरी जीवनावरच्या प्रेमामुळे तिला त्याची क्रीडा न्याहाळण्यात आनंद लाभत असते.''[12] अशीच व्यक्ती निर्लेप वृत्तीने आत्मचरित्रलेखन करीत असते. या भूमिकेतूनच लक्ष्मीबाई तटस्थपणे जीवनाचा वेध घेतात आणि त्यांनी लिहिलेली 'स्मृतिचित्रे' मराठी आत्मचरित्रलेखनात मैलाचा दगड ठरतात, अमर होतात.

### 3. 'स्व' ला केंद्रस्थान

आत्मचरित्राचे प्रस्तुतीकरण मुळातच व्यक्तिकेंद्री असते. त्यामुळेच आत्मचरित्रात 'स्व'ला महत्त्व आहे. पण या 'स्व'ला आत्मचरित्रात कितपत स्थान मिळावे? असा एक प्रश्न निर्माण होतो. 'स्व'चे महत्त्व किती ? आणि हा 'स्व' ज्या परिस्थितीतून निर्माण होतो त्या परिस्थितीला महत्त्व किती? स्वाभाविक 'स्व' हेच आत्मचरित्राचे केंद्र असते. परंतु हा 'स्व' समाजशील प्राणी असल्यामुळे या 'स्व'च्या संपर्कात येणाऱ्या इतरांचेही चित्रण येणारच!

अनुभव हेच आत्मचरित्राचे मुख्य द्रव्य होय. 'स्व'च्या अनुभवकथनात त्याची विचारप्रणाली, त्याचे तत्त्वज्ञान आणि जीवनदृष्टीही मिसळत असते. आत्मचरित्राच्याद्वारे हा 'स्व' स्वतच्या आयुष्याचा अर्थ लावण्याचा एक प्रयत्न करतो. त्याच वेळी तो मानवी आयुष्याचा अर्थ लावण्याचाही प्रयत्न करीत असतो. हा 'स्व' आत्मचरित्रात इतका प्रभावी असावा की वाचकांना तो सतत जाणवत राहावा; कारण ''आत्मचरित्राचे सौंदर्य 'स्व' दर्शनात साठलेले असल्याने आत्मचरित्रात आत्मचरित्रकाराला केंद्रस्थान मिळायला पाहिजे.''[13] 'स्व' हेच आत्मचरित्राचे एकमेव केंद्र असावे अशी अपेक्षा असते. बहुतांश आत्मचरित्रात पात्रांची इतकी गर्दी होते की त्यामुळे 'स्व' कडे लक्ष पुरविले जात नाही. त्याचा परिणाम असा होतो की कुठलीच प्रतिमा स्पष्टपणे उभी राहताना दिसत नाही. कधी–कधी तर 'स्व' प्रतिमा बाजूला सारली जाऊन इतर व्यक्तींच्याच प्रतिमा गडद होतात. उदा. 'मी भरून पावले आहे' या आत्मचरित्रात हमीद दलवाईंना इतकं केंद्रवर्ती स्थान मिळालं आहे की त्यामुळे 'मी भरून पावले आहे' हे मेहरुनिस्सा दलवाई यांचे आत्मचरित्र म्हणावे की हमीद दलवाई यांचे चरित्र म्हणावे असा प्रश्न वाचकांना पडतो. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' – रमाबाई रानडे, 'माझा नंदादीप' – लक्ष्मीबाई पटवर्धन, अशा प्रकारच्या काही आत्मचरित्रांना आत्मचरित्र म्हणावे की, सहचरित्रे म्हणावे असा प्रश्न उपस्थित होतो.

आत्मचरित्रात व्यक्तिजीवनाच्या चित्रणाबरोबरच व्यक्ती ज्या समाजव्यवस्थेत वाढतो त्या समाजाचेही चित्रण येत असते. मग आत्मचरित्रात चरित्रनायकाच्या जीवनाला महत्त्व असावे की हा नायक ज्या समाजात वाढतो त्याचे महत्त्व अधिक असावे? असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो. विशषेतः दलित आत्मचरित्रे वाचत असताना हा प्रश्न अधिक तीव्रतेने उपस्थित होताना दिसतो आणि मग दलित आत्मचरित्रांच्या संदर्भात डॉ.रमेश धोंगडे यांचा निष्कर्ष महत्त्वाचा वाटू लागतो. ते लिहितात – ''आत्मचरित्रांचे प्रस्तुतीकरण मुळातच व्यक्तिकेंद्री असते. व्यक्तीकडून समाजाकडे केंद्र सरकवणे आत्मचरित्रांना विशेष अवघड जाते. साहित्यदृष्ट्या हे अवघड आवाहन असते. मराठीत असे आव्हान पेलणारे आत्मचरित्र नाही. दलित आत्मचरित्रात व्यक्ती आणि समाज हा केंद्रबदल करण्याचा प्रयत्न आहे. पण हा प्रयत्न साहित्यदृष्ट्या यशस्वी होत नाही. याचे कारण हा सांधा बदलण्यात दलित आत्मचरित्रकार साहित्यापेक्षा वक्तृत्वाचा आधार घेतात. व्यक्तिकेंद्री साहित्यकृतीत अपेक्षित असलेली उत्कटता आणि सूक्ष्मता आणि समाजकेंद्री साहित्यकृतीत अपेक्षित असलेला आवका आणि चातुर्य या दोहोंचा अभाव परिणामतः या आत्मचरित्रांत दिसतो.''[14] धोंडगेंचे हे मूलभूत चिंतन विचारप्रवृत्त करणारे आहे.

विशेषतः 'जीणं अमुचं' हे बेबी कांबळे यांचे आत्मचरित्र वाचताना हे जाणवते की या आत्मचरित्रातला 'स्व' तसा अलिप्तच राहतो. हा 'स्व' फक्त घटनासाठी किंवा कधी घटनासाक्षी असतो. त्याची कहाणी, त्याचे जीवन, त्याची व्यक्ती म्हणून ओळख या आत्मचरित्रातून प्रत्ययास येत नाही. या आत्मचरित्रात ना व्यवस्थितपणे लेखिकेची कहाणी जाणवत ना लेखिकेचे चरित्र जाणवत. ना 'चरित्र' ना 'आत्म' असे हे आत्मचरित्र आहे.

आत्मचरित्र हा 'स्व'ची कहाणी असल्यामुळे आत्मचरित्रात 'स्व'ला केंद्रस्थान मिळणे अत्यावश्यक आहे; किंबहुना ती आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराची अपरिहार्य गरज आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

## 4 घटनांची निवड आणि कुशल मांडणी

आत्मचरित्रपर लेखन करणारी कुठलीही व्यक्ती आपलं सबंध आयुष्य तपशिलासह आत्मचरित्रात मांडू शकत नाही; कारण जगलेल्या आयुष्याचा क्षणाक्षणाचा हिशेब ठेवणे कोणत्याही व्यक्तीला शक्य नाही. म्हणूनच जीवनातील काही घटनांच्याद्वारे आत्मचरित्राचा लेखक स्वतःचे आत्मचरित्र लिहीत असतो. जीवनात घडणाऱ्या काही घटनांच्या निवडीला आत्मचरित्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अशा काही घटनांची निवड करून ठसठशीत प्रसंगाच्या साह्याने आपली व्यक्तिरेखा तो सादर करीत असतो.

स्वतःच्या आयुष्यातील अनेक घटना, प्रसंगांतून नेमक्या कोणत्या घटना व प्रसंग निवडायचे याचे पूर्ण स्वातंत्र्य लेखकाला असते. तरीही साधारणतः ज्या घटनांमुळे त्याच्या जीवनाला दिशा मिळाली, ज्या घटना सामाजिक आणि व्यक्तिगत अशा दोन्ही दृष्टिकोनातून महत्त्वाच्या आहेत. ज्या घटनांमुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला सुधारण्याची किंवा बिगडण्याची दिशा मिळाली अशाच घटनांचा अंतर्भाव आत्मचरित्रात असणे आवश्यक आहे. कारण या घटनांमधूनच तो आपली वास्तविक व्यक्तिरेखा साकार करू शकतो. घटना आणि प्रसंगाच्या निवडीचे अनिर्बंध स्वातंत्र्य लेखकाला आहे. याचा परिणाम म्हणूनच काही आत्मचरित्रे विस्ताराने खूप पसरट होताना दिसतात. उदा. आचार्य अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी' न.वि.गाडगीळ यांचे 'पथिक' तर काही आत्मचरित्रे खूप लहान झालेली आहेत. उदा. दिलीप चित्रे यांचे 'शिबा राणीच्या शोधात' बाया कर्वे यांचे 'माझे पुराण' इत्यादी.

ज्या घटनांमधून व्यक्तिमत्त्व ठळकपणे उभे राहील अशाच घटना लेखकाने निवडणे आवश्यक आहे. परंतु बऱ्याचदा घटना निवडताना असे दिसते की, आपण कसे आहोत यापेक्षा लोकांनी आपणाकडे कसे पाहावे याची दक्षता आत्मचरित्रकार घेताना दिसतो आणि मग जीवनातील घटना अशाप्रकारे निवडून नोंदविल्या जातात की काही घटना इतरांपासून लपविता लपविता स्वतःपासूनही लपविल्या जातात. यात आपणच आपली फसगत करीत आहोत हे सोयीस्करपणे विसरल्या जाते. ''दैनंदिनी लिहिणाऱ्यांच्या बाबतीत आपल्या पूर्वायुष्यातील घटनांचे लेखन सोपे होते पण काही घटना वा प्रसंग तुटकपणे आठवतात. तर काहींचे केवळ फलितच लक्षात राहते. मात्र त्याची पार्श्वभूमी किंवा तपशील साफ विसरला गेलेला असतो. साहजिकच कल्पनेने भूतकाळाची पुनर्निमिती करण्याकडे कल दिसतो.''[15] यातून आत्मसमर्थनाची शक्यता बळावताना दिसते.

आत्मचरित्रात सभोवतालच्या समाजाचेही महत्त्वपूर्ण स्थान आहे. हा समाजच व्यक्तित्वाला आकार देतो किंवा त्याची अधोगती करीत असतो. या समाजाचे वास्तव आणि सूक्ष्म चित्र आत्मचरित्रात कलात्मकतेने साधता येणे कठीण आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

आत्मचरित्रातील घटना–प्रसंगांची सत्यासत्यता तपासण्याचे साधन लेखकांशिवाय इतर कुणाजवळही नाही. ''एखाद्या लेखकाने त्याचे आत्मचरित्र 'रंगतदार' करण्यासाठी किंवा धूसर आठवणींना स्पष्टता आणून देण्यासाठी कल्पित तपशिलाचा वापर केला तरी इतरांना त्याचा सुगावा लागू शकत नाही...''[16] त्यामुळे लेखकाने चित्रित केलेले घटना आणि प्रसंग सत्य आहेत किंवा नाहीत याची शहनिशा करता येत नाही. हे या वाङ्मयप्रकाराचे विचित्र वास्तव आहे. शेवटी आत्मचरित्राच्या संदर्भात ना.सी.'डके म्हणतात – ''निर्भेळ अन् सगळंच्या सगळं सत्य सांगणं इतिहासकाराचं कर्तव्य असेल; पण आत्मचरित्र लिहिणारानंही तशीच समजूत ठेवावी असं म्हणणं जरासं धाडसाचं होईल.''[17] फडकेंचं हे मत आत्मचरित्रातील घटना–प्रसंगांच्या संदर्भात उद्‌बोधक प्रकाश टाकणारं आहे.

## संदर्भ टिपा :–


१. खोले विलास (सपां.)'महाराष्ट्रातील राजकारणाचे साहित्यातील प्रतिबिंब', प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, 1998 पृ.66.
२. हस्तक उषा'आत्मचरित्रपर लेखनाची वैशिष्ट्ये', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2006 पृ. 15
३. विजापुरे आनंदीबाई'अजून चालतेची वाट', कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, प्रथम आवृत्ती, 1972पृ. 01
४. हस्तक उषा उ.नि.पृ. 74
५. पवार दया'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, 1978 पृ. 164
६. बच्चन हरिवंशराय'क्या भूलूॅ क्या याद करूँ', राजपाल एण्ड सन्स, कश्मीरी गेट, दिल्ली, बारावी आवृत्ती, 1993 पृ.9.
७. हस्तक उषा उ.नि.पृ. 6
८. भालेराव विमल ''आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे', साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्रथमावृत्ती, 1986.पृ.25
९. हस्तक उषा उ.नि.पृ. 74
१०. वडेर प्रल्हाद'दोन आत्मचित्रे नाच ग घुमा आणि नाथ हा माझा', युगवाणी, नागपूर, नोव्हेंबर–डिसेंबर – 1992पृ. 36
११. पाध्ये कमल 'बंध–अनुबंध', मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, 1993पृ. 08
१२. हस्तक उषा उ.नि.पृ. 73
१३. भालेराव विमल उ.नि.पृ.110
१४. धोंडगे रमेश वा. 'दलित आत्मचरित्रे साहित्य आणि समाज', मधुराव पब्लिकेशन प्रा.लि., रविवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, 1992पृ. 114
१५. कुलकर्णी अ.अ. (प्र.)'प्रदक्षिणा, खंड दुसरा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, प्रथम आवृत्ती, 1991 पृ. 235
१६. हस्तक उषा उ.नि.पृ. 07
१७. आशा सावदेकर ले. फडके सीताराम नारायण, साहित्य अकादमी, प्रथम आवृत्ती, 1995 पृ, 63